# पाऊस

ठाऊक नव्हते पाऊसही कधी इतुका हळवा होत असेल
तव विरहाने अधीर बघ तो घनगर्दी सारून बरसेल...

ठाऊक नव्हते ग्रीष्मातही पाऊस तुजला स्मरत असेल
भीडताना श्वासांना तुझिया मृद्‌गंधातूनी दरवळेल..!

ठाऊक नव्हते गारांसंगे पाऊस चावट होत असेल,
छेडूनी तुजला... पाहूनी त्रस्त, क्षणात एका विरघळेल

ठाऊक नव्हते पाऊस तुजला इतक्या दुरूनी जपत असेल
अश्रूंना पुसण्या तुझिया कुठल्या कुठूनी येत असेल!!

ठाऊक नव्हते रिमझिम त्याची दिस दिस दारी रेंगाळेल
वेडावला तुझियासाठी! ....परतीच्या वाटेवर पाणावेल......

ठाऊक नव्हते पाऊसही वळवाचा इतुका होत असेल!
नकाराने तुझिया एका तोल ढासळूनी कोसळेल..!!

*: जिगीषा*

CONFIDENTIAL